


दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक २८१ ●रविवार,दि.११ जानेवारी २०२६ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये

● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com ● Mo. 9822152955

# संत वामनभाऊ महाराजांचे विचार पिढ्यानपिढ्या मार्गदर्शक : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### संत वामनभाऊ महाराज यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कळशारोपण कार्यक्रम



**बीड । प्रतिनिधी**

समाजाला अध्यात्म, सदाचार आणि एकोप्याचा मार्ग दाखवणारे नाथ परंपरेतील महान संत वामनभाऊ महाराज यांचे विचार काळाच्या ओघातही अधिकच सुसंगत ठरत असून, त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश पिढ्यान्पिढ्या समाजाला मार्गदर्शन करत राहतील, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. संत वामनभाऊ महाराजांच्या ५० व्या, सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, गडाचे महंत विठ्ठल महाराज, आमदार धनंजय मुंडे, सुरेश धस, मोनिका राजळे, तसेच योगेश क्षीरसागर, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, भीमराव धोंडे, विक्रमानंद शास्त्री, स्वामी विश्वेश्वरानंदजी महाराज आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी आणि आशीर्वाद घेण्यासाठी मी येथे आलो आहे. हे निमंत्रण मुख्यमंत्र्याला नसून, संत वामनभाऊ महाराजांच्या एका भक्ताला आणि गहिनीनाथ गडाच्या सेवकाला विठ्ठल महाराजांनी दिलेले आहे, या भावनेतून मी येथे उपस्थित आहे.

नाथ परंपरेतील महान संत आणि शंकराचा अवतार मानले जाणारे संत वामनभाऊ महाराज हे समाजाला दिशा देणारे सद्‌गुरु होते. दऱ्या-खोऱ्यांतून प्रवास करत त्यांनी भागवत पंथाचा प्रचार केला आणि समाजात एकोप्याचा संदेश दिला. मन शुद्ध असेल तर आचरण शुद्ध होते हा विचार त्यांनी समाजमनात रुजवला. त्यांच्या उपदेशामुळे ▶ उर्वरित पान २ वर

# महायुतीच्या प्रचारार्थ ना. पंकजाताई मुंडेंची अहिल्यानगरात भव्य प्रचार रॅली

### फुलांचा वर्षाव, घोषणाबाजी आणि जल्लोषाने परिसर दुमदुमला ; अहिल्यानगर आदर्श शहर बनविण्यासाठी महायुतीने केलेल्या संकल्पास पाठबळ देण्याचे केले आवाहन

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



अहिल्यानगर हे केवळ ऐतिहासिक शहर आहेच पण विकासाच्या दृष्टीने राज्यातील आदर्श शहर बनविण्यासाठी महायुतीने केलेल्या संकल्पास पाठबळ देण्याचे आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी केले. पाणीपुवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, रोजगार आणि नागरिकांच्या मूलभूत सुविधांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या योजना प्रभावी अंमलबजावणी करण्यात कटीबध्द राहणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ शहरात भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. ▶ उर्वरित पान २ वर

# अजितदादांनी पुणेकरांना मोफत प्रवासाची मोठ्ठी स्वप्नं दाखवली, पण गुन्हेगारीचा विषय निघताच कॅज्युअल अप्रोच, म्हणाले...

**पुणे । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज पुणे महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी पक्षाचे हमीपत्र जाहीर केले. या हमीपत्रात पुणे शहराच्या विकासाशी संबंधित विविध मुद्द्यांवर पक्षाची भूमिका आणि आगामी काळातील योजना सविस्तरपणे मांडण्यात आल्या. मोफत प्रवास, वाहतूक कोंडीवर उपाय, पायाभूत सुविधा आणि विकासाचे मोठे दावे करत अजित पवारांनी पुणेकरांना आश्वासनांची मोठी स्वप्नं दाखवली. मात्र, याच वेळी पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीबाबत विचारलेल्या प्रश्नावर त्यांनी गांभीर्याने भूमिका न मांडता उडवाउडवीची




उत्तरं देत विषय टाळल्याने चर्चांना उधाण आले आहे.

पुण्याचा वाहतूक कोंडीचा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे, तितकाच गंभीर प्रश्न शहरातील वाढती गुन्हेगारीही आहे. कोयता गँग, टोळी युद्ध, दिवसाढवळ्या होणाऱ्या हत्या आणि दहशतीमुळे पुणे केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर देशभरात चर्चेत आले आहे. अशा पार्श्वभूमीवर, पुण्याच्या पालकमंत्र्यांकडून गुन्हेगारीवर ठोस भूमिका अपेक्षित असताना अजित पवारांनी उडवाउडवीची उत्तरं दिल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे. आंदेकर कुटुंबाच्या उमेदवारीवर प्रश्न – विशेष म्हणजे, पुण्यातील कुख्यात आंदेकर टोळीशी संबंधित कुटुंबातील दोन सदस्यांना उमेदवारी देण्यात आल्याचा मुद्दा सध्या चर्चेत आहे. सोनाली आंदेकर आणि लक्ष्मी आंदेकर या दोघींनाही आयुष कोमकर हत्या प्रकरणात अटक झाली असून त्या सध्या तुरुंगात आहेत. अशा पार्श्वभूमीवर, तुरुंगात असलेले उमेदवार निवडणूक लढवत असताना त्यावर पक्षाची भूमिका काय? असा थेट प्रश्न अजित पवारांना विचारण्यात आला.

प्रश्न विचारताच ‘उडवाउडवी’ची उत्तरं– शहरातील गुन्हेगारी आणि गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या ▶ उर्वरित पान २ वर

# लाडक्या बहिणींची संक्रात होणार गोड..! ‘या’ तारखेला बँक खात्यात जमा होणार ३ हजार रुपये!

**मुंबई । प्रतिनिधी**




राज्यातील महिलांसाठी राबवण्यात येत असलेल्या ’लाडकी बहीण योजने’बाबत एक महत्त्वाची बातमी समोर आली आहे. या योजनेच्या निकषात न बसणाऱ्या महिलांचा लाभ आता बंद केला जाणार असून, शासनाकडून मोठ्या प्रमाणावर छाननी मोहीम सुरू करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ज्या महिलांच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, अशा महिलांची माहिती नव्याने गोळा केली जात आहे.

उत्पन्न जास्त असेल तर लाभ बंद– माहितीनुसार, ज्या महिलांच्या कुटुंबाचे उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, त्या महिलांचा लाडकी बहीण योजनेतील लाभ बंद केला जाणार आहे. यासाठी महिलांसोबतच त्यांच्या पती किंवा वडिलांची केवायसी करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या प्रक्रियेमुळे चुकीच्या पद्धतीने लाभ घेत असलेल्या महिलांना योजनेतून वगळण्यात येणार आहे.

मकरसंक्रांतीला ३ हजार रुपये खात्यात– दरम्यान, पात्र महिलांसाठी मात्र आनंदाची बातमी आहे. लाडकी बहीण योजनेअंतर्गत डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे पैसे एकत्र ▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या राजकारणात मोठा भूकंप,धनंजय मुंडे भाजपमध्ये जाणार ?

# अजितदादांच्या सहा सभांना दांडी, फडणवीसांच्या कार्यक्रमाला हजेरी

**बीड । प्रतिनिधी**

गहिनीनाथ गडावर आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संत वामनभाऊ यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याला हजेरी लावली. मंत्री पंकजा मुंडे आणि आमदार धनंजय मुंडे यांचीही यावेळी उपस्थिती होती.

राज्याचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या बीड जिल्ह्यातील आतापर्यंतच्या सहा सभांना बायबाय करत गैरहजर राहणारे धनंजय मुंडे देवाभाऊंच्या उपस्थितीतील कार्यक्रमाला मात्र आवर्जून उपस्थित राहिल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या गेल्या. गेल्या आठवड्यात बीडमध्ये अजित पवार यांच्या उपस्थितीत




जिल्हा परिषद अंतर्गत होणाऱ्या विविध विकास कामांचे लोकार्पण, उद्घाटन आणि भुमिपूजन पार पडले. या कार्यक्रमाला आपण पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे हजर राहू शकणार नाही, त्यामुळे कोणीही चुकीचा अर्थ काढू नये, असे धनंजय मुंडे यांनी आपल्या सोशल मीडिया पेजवरून आणि अजित पवार यांनीही आपल्या भाषणातून स्पष्ट केले होते. मुळात या दोघांवरही हे स्पष्टीकरण देण्याची वेळ आली याचाच अर्थ काही तरी बिनसलंय, काही चांगल सुरू नाहीये, असाच लावला जात आहे. अजित पवार यांच्या सभांना दांडी मारणारे धनंजय मुडे गहिनीनाथ गडावरील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीतील कार्यक्रमाला मात्र आवर्जून हजेरी लावतात, याबद्दल आता राजकीय वर्तुळात उलटसुलट चर्चांना उधाण आले आहे.

बीड जिल्ह्यातील बदलले राजकारण, धनंजय मुंडे यांच्या वर्चस्वाला बसलेला धक्का, सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मिक कराड याच्याशी असलेल्या संबंधामुळे गमवावे लागलेले मंत्रिपद यामुळे धनंजय मुंडे सध्या ▶ उर्वरित पान २ वर

# बीडमध्ये नऊ महिन्यांत १,४६१ बालविवाह रोखले

**बीड । प्रतिनिधी**



केंद्र सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या ’बालविवाहमुक्त भारत’ या १०० दिवसीय राष्ट्रीय अभियानात बीड जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी करत संपूर्ण देशात द्वितीय क्रमांक पटकावला आहे. जिल्ह्यातील तब्बल ३१,५१५ नागरिकांनी बालविवाह रोखण्याची ऑनलाइन शपथ घेत सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले आहे. या मोहिमेत अहिल्यानगर जिल्हा देशात प्रथम ▶ उर्वरित पान २ वर




# आष्टी शहरासाठी 10 एम.व्ही.ए. क्षमतेचा नवा ट्रान्सफॉर्मर दाखल

### १३ आधी व आता ११ एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर ; मतदारसंघातील वीज प्रश्न कायमचा सुटणार : आ. सुरेश धस

### आ. सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन ; कामास औपचारिक सुरुवात

**आष्टी । प्रतिनिधी**

यापूर्वी छोटा ट्रान्सफॉर्मर मिळविण्यासाठीही मोठा संघर्ष करावा लागत होता. मात्र आता राज्याचे ऊर्जा खाते मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस यांच्याकडे असल्यामुळे आपल्या मतदारसंघात ट्रान्सफॉर्मर सहज आणि वेगाने मंजूर होऊन उपलब्ध होत आहेत. त्यांच्या दूरदृष्टीमुळे महावितरणमध्ये प्रभावी योजना राबविल्या जात असून येत्या काळात शेतकऱ्यांसाठी वीजपुरवठ्याच्या बाबतीत चांगले दिवस येणार असल्याचा विश्वास आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केला. याआधी १३ आणि आता ११ असे एकूण २३ ट्रान्सफॉर्मर मंजूर झाल्याने मतदारसंघातील वीजेचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले.

मुख्यमंत्री सौर कृषी वीज वाहिनी २.० या महत्त्वाकांक्षी योजनेअंतर्गत आष्टी, पाटोदा व शिरूर तालुक्यांतील कृषी वीजपुरवठा ▶ उर्वरित पान २ वर



# जागतिक हिंदी दिवस : शब्दांचा संस्कार , संस्कृतीचा सेतू आणि जगाशी संवाद साधणारी भारताची ओळख

भाषा ही केवळ संवादाचे साधन नसते ; ती संस्कृतीची ओळख असते , इतिहासाची साक्ष असते आणि समाजमनाचे प्रतिबिंब असते . ज्या भाषेत माणूस स्वप्न पाहतो , वेदना मांडतो आणि आनंद वाटतो – ती भाषा त्याच्या अस्तित्वाचा गाभा बनते . अशा भाषांमध्ये हिंदीचे स्थान अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण आहे . १० जानेवारी रोजी साजरा होणारा जागतिक हिंदी दिवस हा हिंदी भाषेच्या या व्यापक , समृद्ध आणि जागतिक प्रवासाचा उत्सव आहे .

जागतिक हिंदी दिवसाचा इतिहास आणि संदर्भ : १० जानेवारी १९७५ रोजी नागपूर येथे पहिले जागतिक हिंदी संमेलन आयोजित करण्यात आले होते . या संमेलनात जगभरातील हिंदीप्रेमी , लेखक , कवी , अभ्यासक आणि विचारवंत एकत्र आले . हिंदी ही केवळ भारतापुरती मर्यादित भाषा नसून , ती जागतिक संवादाची शक्ती बनू शकते – हा विचार या संमेलनातून पुढे आला . या ऐतिहासिक घटनेच्या स्मरणार्थ भारत सरकारने १० जानेवारी हा जागतिक हिंदी दिवस म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला .

१४ सप्टेंबर : राष्ट्रीय हिंदी दिवसाचे महत्त्व – हिंदी भाषेच्या इतिहासात १४ सप्टेंबर या तारखेलाही विशेष स्थान आहे . १४ सप्टेंबर १९४९ रोजी हिंदीला भारतीय संविधानात राजभाषेचा दर्जा देण्यात आला . या घटनेच्या स्मरणार्थ १४ सप्टेंबर हा राष्ट्रीय हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो . म्हणजेच – १४ सप्टेंबर हा हिंदीच्या संवैधानिक ओळखीचा दिवस आहे , तर १० जानेवारी हा हिंदीच्या जागतिक प्रवासाचा आणि आंतरराष्ट्रीय स्वीकाराचा दिवस आहे . दोन्ही दिवस परस्परपूरक असून हिंदी भाषेच्या वेगवेगळ्या परिमाणांना उजाळा देतात .हिंदी : जगभर पसरलेली भारतीय ओळख –– आज हिंदी भाषा केवळ भारतातच नव्हे , तर जगातील अनेक देशांत बोलली जाते . मॉरिशस , फिजी , सुरिनाम , त्रिनिदाद , टोबॅगो , नेपाळ , दक्षिण आफ्रिका , संयुक्त अरब अमिराती , अमेरिका , कॅनडा , ब्रिटन – या देशांत हिंदीने आपली मुळे घट्ट रोवली आहेत . परदेशातील भारतीय समुदायाने हिंदी जपली , वाढवली आणि पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवली .

भारतामध्ये उत्तर प्रदेश , बिहार , मध्य प्रदेश , राजस्थान , हरियाणा , झारखंड , छत्तीसगड , दिल्ली या राज्यांमध्ये हिंदी मोठ्या प्रमाणावर बोलली जाते . मात्र महाराष्ट्र , गुजरात , कर्नाटक , आंध्र प्रदेश , तामिळनाडू , केरळ या राज्यांमध्येही हिंदी संपर्कभाषा म्हणून मोठ्या प्रमाणावर स्वीकारली गेली आहे .

जगातील भाषांमध्ये हिंदीचे स्थान :– जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांमध्ये हिंदीचा समावेश अग्रक्रमाने होतो . मातृभाषा आणि द्वितीय भाषा म्हणून हिंदी बोलणाऱ्यांची संख्या कोट्यवधींमध्ये आहे . ही संख्या केवळ आकड्यांची नसून , ती हिंदीच्या स्वीकाराची साक्ष आहे .

हिंदी साहित्य : शब्दांमधून उभा राहिलेला समाज –– हिंदी साहित्य म्हणजे केवळ पुस्तके नव्हेत ; तो समाजमनाचा आरसा आहे .

तुलसीदास , कबीर , सूरदास यांनी भक्तीच्या माध्यमातून माणूसपण शिकवले . मुंशी प्रेमचंद यांनी शेतकरी , कामगार , स्त्री , दलित यांच्या वेदना शब्दांत उतरवल्या . महादेवी वर्मा , निराला , दिनकर , हरिवंश राय बच्चन यांनी हिंदीला वैचारिक उंची दिली . वसुधैव कुटुंबकम् ही भावना हिंदी साहित्याने घराघरात पोहोचवली .

हिंदी चित्रपट : लोकसंस्कृतीचा प्रवाह – हिंदी चित्रपटांनी हिंदी भाषा जगभर पोहोचवली .

मेरा जूता है जापानी ,
सारे जहाँ से अच्छा ,
ये देश है वीर जवानों का – ही गाणी केवळ मनोरंजन नाहीत , ती राष्ट्रीय भावना जागवणारी ओळख आहेत . चित्रपटांच्या संवादातून , गीतांमधून हिंदी सामान्य माणसाच्या ओठांवर आली . हिंदी आणि भारतीय एकात्मता – भारत विविध भाषांचा , धर्मांचा , संस्कृतींचा देश आहे .

या विविधतेत हिंदी ही सेतूभाषा बनली . हिंदीमुळे देशाच्या एका टोकाचा माणूस दुसऱ्या टोकाशी संवाद साधू शकतो . ही भाषा कुणावर लादलेली नाही , तर लोकांनी स्वीकारलेली आहे – हीच तिची ताकद आहे .

जागतिक हिंदी दिवसाचा संदेश : – जागतिक हिंदी दिवस आपल्याला सांगतो – भाषा जपणे म्हणजे संस्कृती जपणे . भाषा वाढवणे म्हणजे विचार वाढवणे . आणि भाषा जोडते , ती तोडत नाही . आज डिजिटल युगात हिंदी नवे रूप घेत आहे . मोबाईल , समाजमाध्यमे , संकेतस्थळे , चित्रफिती – या सगळ्यांत हिंदी अधिक प्रभावी होत आहे .

१० जानेवारी – जागतिक हिंदी दिवस
आणि १४ सप्टेंबर – राष्ट्रीय हिंदी दिवस
हे दोन्ही दिवस हिंदी भाषेच्या दोन भिन्न पण महत्त्वाच्या ओळखी आहेत . हिंदी ही केवळ भाषा नाही ; ती भारतीय आत्म्याचा श्वास आहे . ती जिथे जाईल , तिथे भारत जाईल .

**– चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके**
**तहसीलदार , बीड**

# मानवी तस्करी : आधुनिक गुलामगिरीविरुद्ध माणुसकीचा लढा

दरवर्षी ११ जानेवारी रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय मानवी तस्करी जागरूकता दिन' हा केवळ एखादा स्मरणदिन नसून तो समाजाच्या सामूहिक अंतरात्म्याला जागे करणारा एक महत्त्वाचा प्रसंग आहे. स्वातंत्र्य, समानता आणि मानवी हक्क यांची मूल्ये जपत पुढे चालणाऱ्या आधुनिक जगात आजही लाखो स्त्री–पुरुष आणि मुले खरेदी–विक्रीच्या वस्तूसारखी वागवली जातात, ही बाब आपल्या सामाजिक प्रगतीवर मोठे प्रश्नचिन्ह उभे करते. मानवी तस्करी ही काही गुन्हेगारांची विकृती नसून ती दारिद्र्य, विषमता, बेरोजगारी, स्थलांतर, लिंगभेद, शिक्षणाचा अभाव आणि सामाजिक असुरक्षितता या सर्व घटकांच्या परस्पर संबंधातून निर्माण झालेली खोलवर रुजलेली सामाजिक समस्या आहे. म्हणूनच या प्रश्नाकडे केवळ गुन्हेगारी स्वरूपात न पाहता समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक ठरते.

मानवी तस्करी म्हणजे एखाद्या व्यक्तीला फसवणूक, आमिष, धमकी, दबाव किंवा हिंसेच्या माध्यमातून तिच्या इच्छेविरुद्ध एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेऊन तिच्याकडून शोषणात्मक काम करून घेणे. हे शोषण लैंगिक असू शकते, जबरदस्तीची मजुरी असू शकते, घरगुती गुलामगिरी, बालमजुरी, भीक मागणे, अवयव विक्री किंवा सक्तीच्या विवाहाच्या स्वरूपातही ते आढळते. या प्रक्रियेत माणसाचे स्वातंत्र्य, ओळख आणि मानवी प्रतिष्ठा पूर्णपणे नष्ट होते. समाजशास्त्र स्पष्टपणे सांगते की ज्या समाजात सत्ता, संसाधने आणि संधी काही मोजक्या गटांकडे केंद्रीत असतात, तिथे दुर्बल घटकांचे शोषण अपरिहार्यपणे वाढते आणि मानवी तस्करीसारख्या अमानवी प्रथा बळावतात. भारतीय समाजरचना ही ऐतिहासिकदृष्ट्या जात, वर्ग, लिंग आणि प्रदेश यांच्या आधारे विभागलेली आहे. या विषम सामाजिक रचनेमुळे अनेकांना शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या समान संधी मिळत नाहीत. ग्रामीण भागातील दारिद्र्य, शेतीतील अनिश्चित उत्पन्न, आदिवासी भागातील विकासाचा अभाव आणि शहरी झोपडपट्ट्यांतील असुरक्षित जीवन यामुळे लाखो लोक रोजीरोटीच्या शोधात स्थलांतर करतात. या स्थलांतराच्या प्रवासातच दलाल आणि तस्कर गरीब व असहाय लोकांना चांगल्या नोकरीचे, शिक्षणाचे किंवा सुरक्षित आयुष्याचे आमिष दाखवून आपल्या जाळ्यात ओढतात. विशेषतः महिला, मुले, आदिवासी आणि स्थलांतरित कामगार यांच्याकडे माहिती, कायदेशीर संरक्षण आणि सामाजिक पाठबळ कमी असल्याने ते अधिक असुरक्षित ठरतात.

स्त्री आणि मुलींची तस्करी ही मानवी तस्करीचे सर्वात क्रूर रूप मानले जाते. पितृसत्ताक समाजव्यवस्थेत स्त्रीच्या शरीराकडे आणि श्रमाकडे वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती अजूनही खोलवर रुजलेली आहे. याच मानसिकतेतून लैंगिक तस्करीला खतपाणी मिळते. अनेक मुली प्रेमजाळे, खोटी लग्ने, नोकरीचे आमिष किंवा थेट अपहरणाद्वारे वेश्याव्यवसायात ढकलल्या जातात. त्यांच्या आयुष्यावर शारीरिक, मानसिक आणि सामाजिक पातळीवर खोल जखमा उमटतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, ही केवळ काही गुन्हेगारांची कृत्ये नसून स्त्रीला दुय्यम स्थान देणाऱ्या सांस्कृतिक रचनेचे अपयश आहे.

बाल तस्करी ही तर समाजाच्या नैतिक अधःपतनाची परिसीमा आहे. शिक्षण, संरक्षण आणि प्रेमाचा हक्क असलेल्या मुलांना बालमजुरी, भीक मागणे, घरगुती कामे किंवा लैंगिक शोषणासाठी वापरले जाते. अनेक वेळा अत्यंत गरीब कुटुंबेही आपल्या असहायतेमुळे दलालांच्या फसवणुकीला बळी पडतात. समाजशास्त्र सांगते की मुलांचे शोषण हे सामाजिक सुरक्षा जाळ्याच्या अपयशाचे द्योतक आहे. जेव्हा राज्य आणि समाज कुटुंबांना मूलभूत सुविधा पुरवण्यात अपयशी ठरतात, तेव्हा मुले तस्करीच्या जाळ्यात अडकतात.

कामगार तस्करी आणि जबरदस्तीच्या श्रमांची समस्या ही आधुनिक भांडवली अर्थव्यवस्थेची काळी बाजू आहे. असंघटित क्षेत्रात काम करणारे लाखो कामगार कर्ज, आमिष किंवा फसवणुकीमुळे गुलामासारखे राबवले जातात. वीटभट्ट्या, बांधकाम, शेती, कारखाने आणि घरगुती कामांमध्ये त्यांना अत्यंत अमानुष परिस्थितीत काम करावे लागते. जागतिकीकरणामुळे स्वस्त श्रमांची मागणी वाढली असून त्याचा फायदा तस्कर घेतात. समाजशास्त्रीयदृष्ट्या हे आर्थिक विषमतेचे आणि कामगारांच्या दुर्बलतेचे द्योतक आहे.

डिजिटल युगात मानवी तस्करीचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडिया, ऑनलाईन जाहिराती आणि बनावट भरती संस्थांच्या माध्यमातून तरुणांना नोकरी, मॉडेलिंग किंवा परदेशी शिक्षणाचे आमिष दाखवले जाते आणि नंतर त्यांचे शोषण केले जाते. त्यामुळे आज जागरूकता ही केवळ भौतिक जगापुरती मर्यादित न राहता डिजिटल अवकाशातही तितकीच महत्त्वाची आहे. माहितीची असमानता आणि तंत्रज्ञानाचा गैरवापर हे नव्या प्रकारच्या सामाजिक शोषणाचे माध्यम ठरत आहेत.

भारतात मानवी तस्करीविरोधात कायदे आणि योजना अस्तित्वात असल्या तरी अंमलबजावणीतील त्रुटी मोठे आव्हान ठरतात. पोलिस, न्यायव्यवस्था आणि सामाजिक संस्थांमध्ये समन्वयाचा अभाव, तसेच पीडितांविषयी असलेला सामाजिक कलंक, पुनर्वसनाच्या प्रक्रियेला अडथळा आणतो. तस्करीतून सुटलेल्या व्यक्तींना समाजात पुन्हा स्वीकार मिळणे कठीण जाते, आणि त्यामुळे अनेकदा ते पुन्हा शोषणाच्या चक्रात अडकतात.

**–डॉ. राजेंद्र बगाटे**

◆ पान १ वरून पुढे...

## संत वामनभाऊ...

चोरसुद्धा चोरी सोडून माळकरी झाले, ही त्यांची अलौकिक किमया होती, असे त्यांनी सांगितले.

संत वामनभाऊ महाराजांना वाचासिद्धी होती, असे सांगितले जाते. त्यांच्या कीर्तनातून आणि विचारातून समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत अध्यात्म पोहोचले. कितीही पिढ्या बदलल्या तरी त्यांचे कीर्तन, नामस्मरण आणि उपदेश आजही तितकेच महत्त्वाचे आहेत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. प्रसाद वितरणाची परंपरा हे संत वामनभाऊ महाराजांचे मोठे वैशिष्ट्य असून, जिथे–जिथे सप्ताह होतो तिथे भाविकांसाठी पोटभर जेवणाची व्यवस्था केली जाते. पुढील सप्ताहासाठी विविध गावांतून मोठ्या प्रमाणावर मागणी असणे ही संत वामनभाऊ महाराजांच्या कृपेची साक्ष असल्याचेही मुख्यमंत्री म्हणाले. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी शासनाच्या योजनेअंतर्गत विविध कामे हाती घेण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने पूर्ण होत आहेत.

पंढरपूर येथे आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात आली असून, पालखी मार्गाच्या विकासासाठीही लवकरच काम करण्यात येईल, असे आश्वासन देत मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर गहिनीनाथ गडाचा एक अनुयायी म्हणून येथील सर्व विकासकामांची जबाबदारी लोकप्रतिनिधींसह मिळून पार पाडली जाईल. दरवर्षी संधी मिळेल तेव्हा गहिनीनाथ गडावर येऊन संत वामनभाऊ महाराजांचा आशीर्वाद घेत राहीन, असे मुख्यमंत्री म्हणाले. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ महाराजांनी कठीण काळात माणसाला माणूस बनवण्याचे संस्कार समाजाला दिले. सत्य, एकोपे आणि सेवाभावाचे हे संस्कार आजही महाराष्ट्रभर जिवंत आहेत. कष्टकरी, गरीब आणि वंचित समाज वामनभाऊ महाराजांचे विचार विसरलेला नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून गहिनीनाथ गडाच्या विकासाला भव्य स्वरूप मिळत असून, हे कार्य भाविकांच्या श्रद्धेला साजेसे ठरत आहे. सामान्य माणसाच्या श्रद्धास्थानांच्या विकासासाठी केलेले हे कार्य निश्चितच लोकांचा आशीर्वाद मिळवून देणारे आहे असा उल्लेख त्यांनी केला. यावेळी भाविक मोठया संख्येने उपस्थित होते.

## महायुतीच्या प्रचारार्थ....

पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली निघालेल्या या रॅलीला नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी फुलांचा वर्षाव, घोषणाबाजी आणि जल्लोषात संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. सौ. रोशनी आकाश त्र्यंबके, श्री. महेश रघुनाथ तवले, सौ. संध्या बाळासाहेब पवार व श्री. निखिल बाबासाहेब वारे या अधिकृत उमेदवारांच्या समर्थनार्थ मोठ्या संख्येने मतदार सहभागी झाले होते. जलसंपदा मंत्री व अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि ना. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही प्रचार रॅली संत वामनभाऊ नगर चौक, तपोवन रोड–गाडेकर चौक, मुळे एस.टी. डी., लोकनेते गोपीनाथजी मुंडे मार्ग व संत भगवानबाबा चौक या प्रमुख मार्गावरून मार्गस्थ झाली. रॅलीदरम्यान नागरिकांशी थेट संवाद साधला.

प्रचार रॅलीत बोलताना ना. पंकजाताई मुंडे म्हणाल्या, महापालिकेत सक्षम, प्रामाणिक आणि काम करणारे प्रतिनिधी असतील तरच शहराचा विकास वेगाने होतो. भाजपा–राष्ट्रवादी युतीचे उमेदवार विजयी करा. अहिल्यानगरला आधुनिक सुविधा, मजबूत पायाभूत व्यवस्था आणि नव्या रोजगाराच्या संधी देण्याची जबाबदारी आम्ही घेतो. विकास हेच आमचे राजकारण आहे आणि तोच आमचा अजेंडा आहे. पालकमंत्री या नात्याने शहर व जिल्ह्याच्या विकासाची स्पष्ट दिशा मांडताना ना. राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, अहिल्यानगरच्या पाणी प्रश्नावर कायमस्वरूपी उपाय, दर्जेदार रस्ते, सक्षम आरोग्य सुविधा, शिक्षण व रोजगार निर्मिती यावर ठोस काम सुरू आहे. महापालिकेत भाजपा–राष्ट्रवादी युतीचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आले, तर निर्णयक्षम प्रशासन मिळेल आणि विकासकामांना दुप्पट गती मिळेल. नागरिकांचे प्रश्न कागदावर नव्हे, तर प्रत्यक्षात सोडवले जातील. या भव्य प्रचार रॅलीस माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार श्री. संग्राम भैय्या जगताप, भाजपा–राष्ट्रवादी युतीचे अधिकृत उमेदवार, विविध पदाधिकारी, कार्यकर्ते व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मतदार बंधू–भगिनींकडून मिळालेल्या प्रचंड आणि उत्स्फूर्त प्रतिसादामुळे संपूर्ण अहिल्यानगर शहरात निवडणुकीचे वातावरण अधिकच तापले असून, भाजपा–राष्ट्रवादी युतीच्या उमेदवारांच्या बाजूने सकारात्मक आणि भक्कम लाट निर्माण झाल्याचे स्पष्ट चित्र दिसून आले आहे.

## अजितदादांनी पुणेकरांना...

उमेदवारांबाबत प्रश्न विचारताच अजित पवारांनी हा मुद्दा गांभीर्याने न घेता उडवाउडवीची उत्तरं देऊन विषय थांबवला. यामुळे पुण्यातील गुन्हेगारी हा गंभीर प्रश्न नाही का ? असा सवाल उपस्थित झाला आहे. ज्या गुन्हेगारीमुळे पुणेकरांमध्ये भीतीचे वातावरण आहे, त्यावर पालकमंत्री म्हणून स्पष्ट भूमिका मांडणं ही त्यांची जबाबदारी असल्याचं मत व्यक्त केलं जात आहे.

महिन्यात तीन–तीन खून– पुण्यात सध्या रस्त्यावरच हत्या होत आहेत, एका महिन्यात टोळी संघर्षातून तीन–तीन खून होत असल्याच्या घटना समोर येत आहेत. कोयता गँगसारख्या टोळ्यांमुळे सामान्य नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे. अशा परिस्थितीत शहराचा कारभार पाहणारे आणि उपमुख्यमंत्री असलेले अजित पवार गुन्हेगारीबाबत इतकं हलकं उत्तर कसं देऊ शकतात ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गुन्हेगारांना अप्रत्यक्ष पाठबळ ?– अजित पवारांच्या उत्तरामुळे अनेक शंका उपस्थित झाल्या आहेत. गुन्हेगारीवर बोलणं टाळणं म्हणजे गुन्हेगारांना अप्रत्यक्ष पाठबळ देणं आहे का ? गुन्हेगारीचं उदात्तीकरण केलं जात आहे का ? की या विषयावर बोलणंच टाळायचं आहे ? असे अनेक प्रश्न आता पुणेकरांमध्ये चर्चिले जात आहेत.

## लाडक्या बहिणींची...

करून मकरसंक्रांतीच्या सणाला थेट महिलांच्या खात्यात ३,००० रुपये जमा होणार असल्याची माहिती आहे. त्यामुळे अनेक महिलांना एकाचवेळी मोठा दिलासा मिळणार आहे. काही महिलांचा लाभ कायमचा बंद होणार– शासनाकडून सुरू असलेल्या तपासणीत अनेक अपात्र लाभार्थी समोर येत असल्याची माहिती आहे. अशा महिलांचा लाभ कायमस्वरूपी बंद करण्यात येणार असून, यापुढे कोणत्याही परिस्थितीत त्यांना योजनेचा फायदा मिळणार नाही, असे संकेत देण्यात आले आहेत.

## बीडच्या राजकारणात.....

जिल्ह्याच्या राजकारणात बॅकफुटवर आहेत. २०१९ आणि आताच्या २०२४ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत सलग दोनवेळा निवडून आलेल्या धनंजय मुंडे यांना परळी नगरपालिकेची सत्ता राखण्यासाठी पंकजा मुंडे यांच्या म्हणजेच भाजपच्या कुबड्या घ्याव्या लागल्या यातच सगळं आलं, असेही बोलले जाते. परळी नगरपालिकेत सत्ता राखल्यानंतर धनंजय मुंडे यांचे जिल्ह्याच्या राजकारणात कमबॅक होत आहे, असे वाटत असताना अजित पवारांनी मात्र मुंडे यांच्या पक्षांतर्गत विरोधकांना बळ दिल्याचे चित्र आहे. नुकत्याच झालेल्या नगरपालिका निवडणुकीत धनंजय मुंडे यांना स्टार प्रचारक म्हणून नेमले होते, तरी त्यांना परळी आणि गंगाखेड पुरतेच मर्यादित ठेवण्यात आले होते. राष्ट्रवादीच्याच आमदारांनी धनंजय मुंडे यांच्या सभा आम्हाला नको, अशी भूमिका घेतली होती. बीड नगरपालिकेसारख्या महत्वाच्या निवडणुकीची सुत्रंही अजित पवारांनी धनंजय मुंडे यांच्याऐवजी पहिल्यांदाच आमदार झालेल्या गेवराईच्या विजयसिंह पंडित यांच्या हाती दिली. मुंडे यांचे पक्षाकडूनच खच्चीकरण सुरू असल्याची चर्चा यामुळे होताना दिसते. अजित पवारांसोबत व्यासपीठावर येणे धनंजय मुंडे टाळत आहेत का ? असा प्रश्न त्यांच्या सातत्याने गैरहजर राहण्याने उपस्थितीत केला जात आहे. दुसरीकडे धनंजय मुंडे यांची भाजपशी जवळीक वाढू लागली आहे, असेही दिसते. संपूर्ण राज्यात कुठे झाली नाही ती भाजपसोबतची युती परळी नगरपालिकेत झाली. पंकजा मुंडे यांनीही नांदेड जिल्ह्यातील माळीकोळी येथे झालेल्या कार्यक्रमात 'मी परळी धनंजय मुंडेंना देऊन टाकली' असे जाहीर करत आपल्यात आता वाद नाहीत हे स्पष्ट केले. भाऊ अचडणीत असताना आपण मनात कुठलाही आकस न ठेवता भावाच्या जखमांवर मलम लावण्याचे काम केले, असेही पंकजा मुंडे म्हणाल्या होत्या. एकूणच मुंडे–बहीण भाऊ एकत्र येणे आणि त्यांच्यातील वाद संपुष्टात येणे यामागे नेमकं कोण आहे ? याचे कोडे आता कुठे उलगडू लागले आहे. वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथी सोहळ्याच्या निमित्ताने श्री क्षेत्र गहिनीनाथगड येथे मोठा कार्यक्रम पार पडला. या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मंत्री पंकजा मुंडे, आमदार धनंजय मुंडे एकत्र आले होते. फडणवीस यांनी आपल्या भाषणात पंकजा मुंडे यांचे कौतुक करतानाच आमचे धनुभाऊ असा उल्लेख केल्याने उपस्थितांनी टाळ्या वाजवून प्रतिसाद दिला. अजित पवारांपासून अंतर राखून असणारे धनंजय मुंडे हे देवेंद्र फडणवीस यांच्या मात्र अधिक जवळ जात आहेत. राष्ट्रवादीचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे मंत्रिपद गेल्यानंतर दोनवेळा धनंजय मुंडे यांच्या मंत्रिमंडळातील वापसीची चर्चा झाली. मात्र, ती फक्त चर्चाच ठरली. बीड जिल्ह्यातील पक्षांतर्गत विरोधकांना दिले जाणारे बळ, मंत्रिमंडळात परत घेण्यात होणारी टाळाटाळ यामुळे धनंजय मुंडे नाराज असल्याच्याही चर्चा आहे. अशावेळी त्यांची मुख्यमंत्र्यांसोबत वाढणारी जवळीक भविष्यातील मोठ्या राजकारणांची नांदी तर नाही ना ?

## बीडमध्ये नऊ...

आला आहे. २७ नोव्हेंबर २०२५ पासून सुरू झालेले हे अभियान ०८ मार्च २०२६ पर्यंत चालणार आहे. या अभियानाची सुरवात विशाखापट्टणम येथून करण्यात आली होती. देशातील बालविवाहाची गंभीर समस्या लक्षात घेऊन जनजागृती, विविध स्पर्धा आणि उपक्रमांच्या माध्यमातून ही व्यापक चळवळ उभारली जात आहे. शपथ अभियानात बीड जिल्ह्याने मोठी आघाडी घेतली असून, महाराष्ट्रात अहिल्यानगर प्रथम, तर देशपातळीवर बीड जिल्हा द्वितीय स्थानी आहे. शिक्षण विभाग, पंचायत विभागाचे ग्रामविकास अधिकारी, अंगणवाडी सेविका आणि आशा वर्कर्स यांनी मोलाची भूमिका बजावली आहे. अशी घ्यावी शपथ– संवेदनशील नागरिकांनी बालविवाहाविरुद्ध https://stopchildmarriage.wcd.gov.in/ या संकेतस्थळावर जाऊन शपथ घ्यावी, जेणेकरून बीड जिल्हा देशात प्रथम क्रमांकावर येईल, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. जिल्ह्यात कोठेही बालविवाह होत असल्याचे आढळल्यास तत्काळ 'चाइल्ड हेल्पलाइन' टोल फ्री क्रमांक १०९८ वर संपर्क साधावा. माहिती देणाऱ्याचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवले जाते. आता सकारात्मक बदल– महिलांवरील छळ, बालविवाह आणि स्त्री भ्रूणहत्या अशा नकारात्मक बाबींत कधीकाळी चर्चेत असलेल्या बीड जिल्ह्यातील सामाजिक परिस्थितीत आता सकारात्मक बदल घडत असल्याचे चित्र आहे. जिल्ह्यातील विविध सामाजिक घटक आणि प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे एप्रिल ते डिसेंबर २०२५ या केवळ नऊ महिन्यांच्या कालावधीत तब्बल १,४६१ बालविवाह रोखण्यात यश आले आहे.

## आष्टी शहरासाठी....

अधिक सक्षम व सुरळीत करण्यासाठी मोठा निर्णय घेण्यात आला आहे. आष्टी, पाटोदा, शिरूर आणि कासार तालुक्यांतील एकूण ११ वीज उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० व ५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त पावर ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. त्याच पार्श्वभूमीवर आज शनिवार (दि. १०) रोजी १० एम.व्ही.ए. क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर आष्टी शहरासाठी दाखल झाला. या ट्रान्सफॉर्मरचे आमदार सुरेश धस यांच्या हस्ते विधीवत पूजन करण्यात आले.

या नव्या ट्रान्सफॉर्मरमुळे कृषी पंपांना स्थिर वीजपुरवठा लोडशेडिंग व भार नियंत्रणात सुधारणा कमी व्होल्टेजची समस्या दूर– शेतकऱ्यांना दिवसाच्या वेळेत दर्जेदार वीज– या सर्व बाबींना मोठा फायदा होणार असून परिणामी शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नातही सकारात्मक बदल घडून येणार आहे.– १० एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर : ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, आष्टी, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, धानोरा,
५ एम.व्ही.ए. क्षमतेचे अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर : ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, सावरगाव, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, जळगाव (कडा कारखाना), ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, डोईठाण, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कुसळंब , ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, लांबरवाडी, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, कोतन, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, दासखेड, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, घाटशीळ–पारगाव, ३३/११ के.व्ही. उपकेंद्र, भायाळ या ठिकाणी नव्या क्षमतेचे ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार असून त्यापैकी आज आष्टी शहरात ट्रान्सफॉर्मर प्रत्यक्ष दाखल झाल्याने नागरिक व शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी नगराध्यक्ष जिया बेग, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे, ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, भाऊसाहेब भवर, महावितरणचे उपअभियंता शिवाजी देशमुख, महेश हंबर्डे, भाऊसाहेब निंबाळकर, सुनील मेहेर, बाळू शेठ मेहेर, भारत मुरकुटे, सुरेश वारंगुळे, विठ्ठल शेंबडे, राजू निकाळजे, बाळासाहेब घोडके, शमशोद्दीन शेख, श्रेयस मेहेर, इरशान खान, अविनाश गिरी, राजेंद्र जोशी, अनंतदेवा जोशी, सुनील रेडेकर, राहुल मुथ्था, मनोज धनवडे, कपिल अग्रवाल, नितीन खिळे, गणेश पोकळे, अजित मुळे, सागर धोंडे, बबलू शेख, सतीश टकले यांच्यासह व्यापारी,पत्रकार,नागरिक,अनेक मान्यवर उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## परळी पालिकेत ....

काँग्रेसचे १६, भाजपचे ७ तर शिवसेनेचे २ नगरसेवक निवडून आले. त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा संयुक्त गट स्थापन करण्यात आला. मात्र गटनेता निवडीसाठी नगरसेवकांच्या नावांसमोर पक्षनिहाय उल्लेख न केलेले पत्र जिल्हाधिकाऱ्यांसमोर सादर करण्यात आले. याची शिवसेनेला याबाबत माहिती मिळाली नाही. तसेच एमआयएमला गटात समाविष्ट करण्याबाबतही शिवसेनेला पूर्व कल्पना दिली नसल्याचे मुळूक यांनी सांगितले. त्यामुळे या प्रक्रियेशी शिवसेनेचा कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसने राजकीय स्पष्टता दाखवून एमआयएमला गटातून वगळावे. अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, असेही मुळूक म्हणाले.

## आयुष्यमान भारत...

मार्गदर्शनाखाली स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयाने सलग अनेक वर्षे मराठवाड्यात अव्वल स्थान कायम राखले आहे. त्यांनी या योजनेची जबाबदारी घेतल्यानंतर गत सात वर्षांत जवळपास ४० हजार रुग्णांना या योजनेअंतर्गत लाभ प्राप्त झाला आहे. योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे यांच्या नेतृत्वाखाली मेडिसिन, सर्जरी, बालरोग, अस्थिरोग, स्त्रीरोग, नेत्ररोग, ईएनटी या चिकित्सालयीन विभागांसह नेस्थेशिया, रेडिओलॉजी, पॅथॉलॉजी व बायोकेमिस्ट्री विभागांचे मोलाचे सहकार्य लाभले. तसेच स्टाफ नर्सेस, निवासी डॉक्टर व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांनी घेतलेल्या सातत्यपूर्ण परिश्रमांमुळेच हे यश शक्य झाल्याचे डॉ. चाटे यांनी नमूद केले. या योजनेचे महाराष्ट्र प्रमुख डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाचा योजनेच्या व्यापक स्वरूपात सामान्य जनतेपर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी होत असतो असेही त्यांनी यावेळी नमूद केले. महाविद्यालयात विकसित करण्यात आलेल्या योजना अंमलबजावणीच्या 'स्वाराती पॅटर्न'चा अभ्यास करत लातुर व नांदेड येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांनी आपली कामगिरी सुधारली आहे .

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या...

पाहता व अनुभवता आली. यामुळे वाचकांमध्ये डिजिटल साधनांविषयी मोठी उत्सुकता आणि जागरूकता निर्माण झाली. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, आजच्या डिजिटल युगात ग्रंथालये केवळ पुस्तके देणारी ठिकाणे न राहता ज्ञानाची स्मार्ट केंद्रे होत आहेत. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांचा माहिती शोधण्याचा दृष्टिकोन व्यापक होतो. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रंथपाल डॉ. गोपाळ सगर व ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. प्रदर्शनातील नियोजनबद्धतेमुळे वाचकांना आधुनिक ग्रंथालयातील सेवांची सविस्तर माहिती घेता आली. एकूणच शिस्तबद्ध, अभ्यासपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात प्रदर्शन यशस्वी झाले. यामुळे वाचनसंस्कृतील नवी दिशा मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## बीड मध्ये भरदिवसा '...

असलेल्या रस्त्याने पायी घरी जात होत्या, दरम्यान त्या घोडके हॉस्पिटल समोर असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात इसमांनी त्यांच्या गळ्यातील मिनी गंठण किंमत ६५ हजार रुपायाचे ओढून घेऊन पळ काढला आहे. याप्रकरणी ज्योती शिंदे यांच्या फिर्यादीवरून शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात दोन चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास शिवाजीनगर पोलीस करीत आहेत. मात्र शहर या वाढत्या घटना पाहता चैन स्नॅचिंग करणाऱ्यांची दहशत निर्माण झाली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# बीड जिल्हा पो. अ. श्री नवनीत कांवत व स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. श्री शिवाजी बंडेवाड यांना लोक रत्न पुरस्कार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याच्या कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत साहेब यांना बाळशास्त्री जांभेकर या दर्पण दिनानिमित्त सोमेश्वर हनुमान मंदिर फाउंडेशन व लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले मा पोलीस अधीक्षक नवनीत कावत साहेब यांचे काम अतिशय उत्कृष्ट असल्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारीला हद्दपार करणारे एकमेव एसपी म्हणून नवनीत कावन साहेब यांच्याकडे सध्या जिल्हावासीय पाहत आहेत म्हणून त्यांचे कार्य अप्रतिम आहे उत्कृष्ट आहे म्हणून त्यांना महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघ व सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला तसेच बीड जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान सी ओ साहेब यांचे देखील जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कर्तव्य अतिशय उल्लेखनीय आहे कारण जिल्हा परिषदेचा चार्ज घेतल्यापासून अनेक काम-कुचार अधिकाऱ्यावर तसेच जिल्हा परिषदेमध्ये विविध विभागात भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यावर देखील त्यांनी निलंबनाच्या कारवाया केल्या आहेत तसेच वेळोवेळी पंचायत समिती असो की जिल्हा परिषदेमधील अनेक विभाग असो अशा जिल्हा परिषदेमधील विविध विभागावर त्यांचे सातत्याने कडक नियंत्रण असते म्हणून बीड जिल्हा परिषद आता एक उत्कृष्ट चांगल्या प्रकारे या जिल्हा परिषदेचे प्रशासकीय कामकाज चालत असल्यामुळे सर्व बीड जिल्ह्यातील जनतेमधून आनंद व्यक्त होत आहे म्हणून या महत्त्वाच्या अधिकाऱ्याचा देखील लोकशाही पत्रकार संघाच्या वतीने सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशन यांच्या वतीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जतिन रहमान सर यांना देखील सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले तसेच बीड जिल्हा स्थानिक गुन्हे शाखेला लाभलेले इंटेलिजन्स पोलीस निरीक्षक मा श्री शिवाजी बंडेवाड साहेब यांना देखील लोक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी येथे उपस्थित असलेले श्री सोमेश्वर महादेव हनुमान मंदिर फाउंडेशनचे अध्यक्ष तथा लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे उपाध्यक्ष मा श्री नवनाथ अण्णा शिराळे पाटील तसेच महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष बीबी वैद्य साहेब माजी नगरसेवक बाबुराव परळकर तसेच लोकशाही पत्रकार संघाचे बीड जिल्हा संघटक संजीवनी व कुलकर्णी हे यावेळी उपस्थित होते.

## कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बीएससी नर्सिंग स्कूलमध्ये शपथविधी, लॅम्प लाइटिंग समारंभ संपन्न

**● विद्यार्थ्यांनी यशाद्वारे पालकांचे स्वप्न साकारावे – अधिक्षक दत्तात्रय केंद्रे**

**केज । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम आणी मेहनतीच्या जोरावर यश मिळवून पालकांचे स्वप्न पूर्ण करावे तसेच विविध क्षेत्रात कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक करावा असे आवाहन केज उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांनी कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बीएससी नर्सिंग कॉलेजमध्ये आयोजित प्रथम वर्षातील विद्यार्थांच्या शपथविधी व लॅम्प लाइटिंग समारंभा प्रसंगी केले आहे.*



रेणुकामाता कृषी विकास प्रतिष्ठान देवगाव संचलित कृष्णाई इन्स्टिट्यूट ऑफ बीएससी नर्सिंग कॉलेज केज येथिल प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांचा शपथविधी व लॅम्प लाइटिंग समारंभाचे आयोजन शुक्रवारी करण्यात आले होते.कार्यक्रमाचा शुभारंभ केज उपजिल्हा रूग्णालयाचे अधिक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे,तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अशोक गवळी व संस्थेचे उपाध्यक्ष विजयकांत (भैय्या) मुंडे यांच्या शुभहस्ते करण्यात आला तर संस्थेचे सचिव अतुल (दादा) मुंडे,केज येथिल योगिता नर्सिंग होमचे संचालक डॉ.दिनकर राऊत,कळंब येथिल जाधवर हॉस्पिटलचे संचालक डॉ.अभिजित जाधवर,कळंब येथिल ओम हॉस्पिटलचे संचालक डॉ.रमेश जाधवर,केज येथिल श्रेया हॉस्पिटलचे संचालक डॉ.तेजस थोरात,केज येथिल विठाई हॉस्पिटलचे संचालक डॉ.ब्रम्हा डोईफोडे,सातारा येथिल मेडिकल ऑफिसर सानप साहेब,संस्थेचे समन्वयक नवनाथ काकड सर,प्रा.किशोर मोरे सर,विशाल इंगळे,विडा येथिल रेणूका नर्सिंग स्कुलचे प्रा.रवि मुळे सर,कॉलेजचे प्राचार्य प्रविण खुणे सर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.विद्यार्थ्यांनी अभ्यासासोबतच तांत्रिक कौशल्ये समस्या सोडवण्याची क्षमता,विश्लेषण क्षमता,संवाद कौशल्ये आणि वेळेचे नियोजन यांसारख्या कौशल्यांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन योगिता नर्सिंग होमचे संचालक डॉ.दिनकर राऊत यांनी केले आहे.प्रसंगी संदिप कुलकर्णी सर,प्रियंका उदारे मॅडम,ज्ञानेश्वरी बांगर मॅडम,प्रमोद कांबळे सर रूषिकेश कातकाडे यांच्यासह शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी,पालक विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## नमो श्रीराम नामाचा अखंड जयघोष : महाजनवाडी ते अयोध्याधाम ७५ दिवसीय पायी रथयात्रेचा आज होणार प्रारंभ – विष्णुदास महाराज सुरवसे

**बीड । प्रतिनिधी**

श्रीराम नवमीच्या पावन पर्वनिमित्त श्रीक्षेत्र महाजनवाडी,ता. जि.बीड येथून श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे जाणारी ७५ दिवसीय, सुमारे २००० किलोमीटर अंतराची पायी 'नमो श्रीराम नाम रथयात्रा दिंडी सोहळा' भक्तिभाव, त्याग, सेवा व संकल्पशक्तीचे जिवंत प्रतीक ठरत आहे. ही ऐतिहासिक व अध्यात्मिक रथयात्रा रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी श्री हनुमान मंदिर, श्रीक्षेत्र महाजनवाडी येथून सकाळी ९ वा. मंगल प्रारंभ होणार आहे. या रथयात्रेची गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी, श्रीराम नवमीच्या पावन दिवशी श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे सांगता होणार आहे. ही यात्रा म्हणजे केवळ पायांची चाल नव्हे, ही अंत:करणाची ओढ, ही यात्रा



म्हणजे केवळ रथाचा प्रवास नव्हे ही आहे श्रीराम नामाची अखंड धारा अशी माहिती भाजपा अध्यात्मिक आघाडीचे बीड जिल्हा संयोजक विष्णुदासजी महाराज यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

ही दिंडी व रथयात्रा श्रीरामभक्त विष्णुदासजी महाराज सुरवसे यांच्या पावन आयोजनातून व दृढ संकल्पनेतून साकार होत आहे. केवळ प्रवास नव्हे, तर ही ७५ दिवसांची चालती तपश्चर्या, चालता यज्ञ, चालता नामसंकीर्तन महोत्सव आहे. पायी चालताना प्रत्येक पाऊल रामनामात न्हाऊन निघणार आहे. रथयात्रेच्या वाटेवरील गावोगावी श्रीराम भक्तिरसाचा सुगंध दरवळणार आहे. या नमो श्रीराम नाम रथयात्रेमध्ये श्रीराम नामाचा अखंड नामजप, सायंकाळी मुक्कामाच्या ठिकाणी हनुमान मंदिरामध्ये भावार्थ रामायण कथा संपन्न होणार आहे. सामाजिक एकोपा, व्यसनमुक्ती, सदाचार, राष्ट्रप्रेम, संस्कृती संवर्धन व सनातन मूल्यांचा संदेश या यात्रेच्या माध्यमातून जनमानसात रुजवला जाणार आहे.

महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश या तीन राज्यांमधून पायी प्रवास करत, ही रथायात्रा दिंडी अनेक संतभूमी, तीर्थक्षेत्रे व ग्रामदेवता यांच्या चरणी नतमस्तक होत अयोध्येकडे मार्गस्थ होणार आहे. या ७५ दिवसीय कालावधीत श्रीराम भक्त प्रत्यक्ष सहभाग घेणार असून, लाखो श्रीराम भक्त व भाविकांचे आशीर्वाद व शुभेच्छा रथयात्रेस लाभणार आहेत. तसेच गुरुवार, दिनांक २६ मार्च २०२६ रोजी म्हणजेच श्रीराम नवमी दिवशी श्रीक्षेत्र अयोध्याधाम येथे भव्यदिव्य व ऐतिहासिक 'लक्ष्मण शक्ती मुक्तोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. या वेळी श्रीराम रामलल्ला दर्शन, भव्य श्रीराम नाम शोभायात्रा, संत–महंतांचे प्रवचन व विशेष धार्मिक कार्यक्रम संपन्न होणार आहेत. अशी माहिती भाजपा अध्यात्मिक आघाडीचे बीड जिल्हा संयोजक विष्णुदास महाराज सुरवसे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## डाक विभागाच्या आउटलेटसाठी प्रस्ताव मागविले

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

भारतीय डाक विभागाकडून खासगी व्यक्तींना फ्रँचायझी आउटलेट चालविण्याची उत्कृष्ट व्यवसाय संधी देण्यात येणार असून त्यासाठी इच्छुकांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

या योजनेअंतर्गत फ्रँचायझीधारकांना सर्व प्रकारच्या डाक वस्तूंचे बुकिंग करण्याचा अधिकार देण्यात येईल. यासाठी दैनिक व मासिक स्वरुपात आकर्षक कमिशन मिळणार आहे. कमी गुंतवणुकीत आणि शासकीय पाठबळासह हा व्यवसाय स्थिर व विश्वासार्ह उत्पन्नाचा स्त्रोत ठरु शकतो.

या फ्रँचायझी योजनेचे फायदे: विश्वसनीय व प्रतिष्ठित शासकिय संस्थेशी संलग्नता, आकर्षक कमिशन रचना, डाक सेवांची वाढीची संधी, डाक विभागाकडून आवश्यक मार्गदर्शन व सहकार्य. या उपक्रमाचा उद्देश डाक सेवांचा विस्तार करणे, नागरिकांना अधिक सोयीस्कर सेवा उपलब्ध करुन देणे हा आहे.

इच्छुक कुरिअर सेवा पुरवठादार व व्यक्तींनी आपले अर्ज प्रवर डाक अधीक्षक छत्रपती संभाजीनगर टपाल विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे पाठवावे, अधिक माहितीसाठी ०२४०–२९७०६१० या क्रमांकावर संपर्क साधावा.

# गंगाभारती महाराज पतसंस्थेच्या ठेवीदारांचा एल्गार

## जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण... प्रशासनाच्या दिरंगाईमुळे ठेवीदारांमध्ये तीव्र संताप

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील गंगाभारती महाराज ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थेत झालेल्या कोट्यवधी रुपयांच्या अपहारप्रकरणी अद्यापही कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने संतप्त ठेवीदारांनी आता आरपारच्या लढ्याचा पवित्रा घेतला आहे. या अन्यायाविरोधात ९ जानेवारीपासून बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार असल्याचा इशारा युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष श्री. हरिओम क्षीरसागर यांनी निवेदनाद्वारे दिला होता.

मार्च २०२३ मध्ये करचोंडी



(मुख्य शाखा), लिंबागणेश, मांजरसुंबा, चौसाळा व पिंपळवाडी या शाखांमध्ये मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आला होता. या पतसंस्थेत गरीब शेतकरी, कष्टकरी मजूर, विधवा महिला तसेच वृद्ध नागरिकांनी आपल्या आयुष्याची कमाई विश्वासाने जमा केली होती. मात्र मुलांचे शिक्षण, लग्नकार्य व औषधोपचारासाठी ठेवलेली ही रक्कम पतसंस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व कर्मचाऱ्यांनी संगनमताने हडप केल्याचा गंभीर आरोप ठेवीदारांनी केला आहे. दोन वर्षे उलटूनही आरोपी मोकाटच– या अपहारप्रकरणी दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांविरोधात नेकनूर पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. ००४५/२०२४) दाखल करण्यात आला आहे. मात्र तब्बल दोन वर्षांचा कालावधी लोटूनही आरोपी अद्याप फरारच आहेत. पतसंस्थेचे अध्यक्ष सुभाष विठ्ठलराव शिंदे, उपाध्यक्ष रामेश्वर सोनाजी ढेरे, व्यवस्थापक बंकट नारायण शिंदे तसेच इतर संचालक मंडळ मोकाट फिरत असताना पोलिसांकडून अटक का होत नाही? असा संतप्त सवाल ठेवीदार उपस्थित करत आहेत. प्रशासकीय यंत्रणेवर गंभीर आरोप– या प्रकरणात नियुक्त करण्यात आलेले प्रशासक पूर्णतः निष्क्रिय असून, लेखापरीक्षक अधिकारी जाणीवपूर्वक अहवाल सादर करत नसल्याचा आरोप ठेवीदारांच्या निवेदनात करण्यात आला आहे. यापूर्वी १५ ऑगस्ट २०२५ रोजी पालकमंत्री अजितदादा पवार यांनाही निवेदन देण्यात आले होते. मात्र केवळ आश्वासनांपलीकडे कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही.

९ जानेवारी रोजी आंदोलन करण्यात येणार असल्याबाबत जिल्हा उपनिबंधक यांना निवेदन देण्यात आले होते. तसेच १९ डिसेंबर रोजी पुन्हा निवेदन देऊनही प्रशासनाकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याशी चर्चा करून आंदोलन तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आले होते. मात्र त्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.

अनेक ठेवीदारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न गंभीर बनला आहे. न्याय मिळेपर्यंत आता शांत बसणार नाही. प्रशासनाने तात्काळ आरोपींना अटक करून त्यांची मालमत्ता जप्त करावी व ठेवीदारांचे पैसे व्याजासह परत करावेत, असा ठाम इशारा युवा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष हरिओम क्षीरसागर यांनी दिला आहे.

# प्रबुद्ध समाज बनविण्यासाठी नीतीवान माणूस बनणे गरजेचे : प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड

## महाविहार धम्मभूमी शिवणी येथे पौष पौर्णिमा व सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात संपन्न

**बीड । प्रतिनिध**

महाविहार धम्मभूमी शिवणी येथे प्रत्येक पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रम आयोजित केला जातो. ह्या पौष पौर्णिमेदिनी धम्मदेशना व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १९५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले प्रा.डॉ. मिलिंद आव्हाड ( जे एन यु दिल्ली तथा अध्यक्ष मानवी हक्क अभियान) आपल्या मनोगतात म्हणाले की प्रबुद्ध समाज बनण्यासाठी नीतिवान माणूस बनावे लागेल.सम्यक ज्ञानाने व पालनाने समाज धम्माशील बनू शकतो. माता रमाईचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर बद्दलचा जिव्हाळा, प्रेम जसे होते तसाच जिव्हाळा,प्रेम क्रांतीसुर्य ज्योतिबा



फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्यामध्ये होता. या महान मानवाचे व मातेचे स्मरण सतत ठेवून आपल्या जीवनात शिक्षण हे नीतीवान माणूस घडण्यासाठी कसे महत्त्वाचे आहे हे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे वंचितांच्या, बहुजनांच्या व सर्व स्त्री-पुरुषांच्या शिक्षणाचे प्रणेते आहेत. तरी शिक्षणाशिवाय पर्याय नाही हे लक्षात ठेव स्व उधारा बरोबरच समाजाचे व देशाचे हित कसे साध्य करता येईल ह्याकरिता सतत प्रयत्नशील असली पाहिजे असे आग्रेपणे प्रतिपादन केले.

कार्यक्रमास उपस्थित असलेले पूज्य भंते धम्मशील थेरो पु. पय्यावर्धन पु भंते बुद्धबोधी यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध प्रतिमेस पुष्प व दीप धुपाने पूजन करून सावित्रीबाई फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुष्पमाला मान्यवरांच्या हस्ते अर्पण करून अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक सेवानिवृत्त सीईओ पी.व्ही. बनसोडे यांनी केले. व आपल्या प्रास्ताविकात संस्थेच्या कार्याबद्दल माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल माहिती दिली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.अंकुश कोरडे यांनी केले. संस्थेस अमेरिकेमध्ये उच्च पदावर कार्य करणारे प्रतीक देविदास तांगडे यांच्या आई-वडिलांनी संस्थेला आर्थिक दान दिले. तसेच भोजनदान देणारे सखाराम उजगरे व खीरदान देणारे राहुल सोनवणे तसेच आदिती तुकाराम कांबळे एम.बी.बी.एस.ही वैद्यकीय पदवी मिळवणाऱ्याचा संस्थेतर्फे यथोचित सत्कार करण्यात आला. पूज्य भिक्खु पय्यावर्धन आपल्या मुख्य धम्मदेशनेत म्हणाले की जगाला शांतीचा, समतेचा,संदेश देणारे व दुःखमुक्तीचा मार्ग दाखवणारे तथागत गौतम बुद्धांच्या जीवनात पौर्णिमेच्या दिवसाला अनन्य साधारण महत्व आहे. राजा बिंबीसाराने पौष पौर्णिमेला सम्यक संकल्प करून तथागतांना भिक्खु संघाकरिता वेळुवन दान केले होते. तरी तथागतांच्या उपदेशाप्रमाणे आपल्या जीवनात दानपारमीतेला उच्च स्थान देणे लक्षात घेऊन मानवाला, अति दुर्मिळ लाभलेले मानवी जीवन अरहंत पदाकडे वाटचाल करणे हे सर्वांच्या हिताचे आहे, अशी मोलाची धम्मदेशना देऊन वातावरण धम्ममय केले.

कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे व बहुसंख्य सदस्य, बीड शहरातील व परिसरातील बहुसंख्य उपासक उपासिकांची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सामाजिक कार्यकर्ते राजू जोगदंड यांनी व्यक्त केले. पूज्य भंते धम्मशील थेरो यांच्या आशीर्वाद गाथेने व शरणातयेणे कार्यक्रमाची सांगता झाली.

## लोखंडे महाराज गंगाई बाबाजी समाजभूषण पुरस्काराने सन्मानित



**बीड । प्रतिनिध**

समाजातील अध्यात्मिक, धार्मिक व तर्कशास्त्रीय क्षेत्रात आगळेवेगळे व समाजोपयोगी कार्य करणारे राजू महाराज लोखंडे यांची गंगाई-बाबाजी समाजभूषण पुरस्कार २०२५ साठी निवड करण्यात आली आहे. गंगाई-बाबाजी पुरस्कार संयोजन समितीच्या वतीने त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले राजू महाराज लोखंडे यांचे प्राथमिक शिक्षण दिघोळ ता.जामखेड येथील जिल्हा परिषद शाळेत झाले.शालेय जीवनापासूनच अध्यात्माची ओढ असलेल्या महाराजांनी पुढे एम.ए.पर्यंत शिक्षण पूर्ण केले. पाटोदा येथे स्थायिक झाल्यानंतर त्यांनी खेमानंद महाराजांचे शिष्यत्व स्वीकारले. काही काळ वैराग्यमूर्ती रामकृष्ण रंधवे महाराज यांच्या संस्थेत सेवा केल्यानंतर अध्यात्मिक साधनेला पूर्णतः वाहून घेतले. ब्रह्मचारी वृत्तीने जीवन जगत असताना त्यांनी तारखेच्या तर्कशास्त्रावर आधारित विलक्षण ज्ञान आत्मसात केले. कोणताही ज्योतिषशास्त्राचा औपचारिक अभ्यास न करता केवळ तर्कशक्तीच्या आधारे व्यक्तीची जन्मतारीख, वार तसेच जीवनातील संभाव्य घटना अचूकपणे सांगण्याची अद्भुत क्षमता त्यांनी प्राप्त केली आहे. त्यांच्या अनेक भाकितांचा अनुभव आजवर खरा ठरलेला असून राज्य

दैनिक मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर
● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● रविवार, दि. ११ जानेवारी २०२६ ● पान ४



*वैराग्यमूर्ती संत वामन भाऊ यांच्या सुवर्ण महोत्सवी पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त प्रतिवर्षीच्या परंपरेप्रमाणे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या हस्ते व गडाचे महंत ह्भप विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या प्रमुख उपस्थितीत संत वामनभाऊ महाराजांच्या समाधीची महापूजा संपन्न झाली. मागील २५ वर्षांपासून धनंजय मुंडे यांना पुण्यतिथी सोहळ्याच्या महापुजेचा मान असून, वामनभाऊंच्या पुण्यतिथीचा सुवर्णमहोत्सव व धनंजय मुंडे यांच्या हस्ते पूजेचा रौप्यमहोत्सव पूर्ण झाला! यावेळी भक्तीमय वातावरणात महापूजा व आरती संपन्न झाली.*

# केज येथे लवकरच होणार ई-बस आगार
## आ. नमिता मुंदडा यांच्या पाठपुराव्याला यश




**केज । प्रतिनिधी**

केज शहरात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे नवीन ई-बस आगार आणि चार्जिंग स्टेशन उभारण्याच्या हालचालींना वेग आला आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी केज येथे स्वतंत्र आगार निर्मितीसाठी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत महामंडळाने या प्रस्तावावर कार्यवाही सुरू केली आहे. मुख्यमंत्री सचिवालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशांनुसार, महामंडळाच्या ५१५० ई-बस प्रकल्पांतर्गत केज येथे हे अत्याधुनिक आगार प्रस्तावित करण्यात आले असून, यामुळे परिसरातील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

सध्या केज हे तालुक्याचे ठिकाण असून येथे केवळ बसस्थानक कार्यरत आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी धारूर, कळंब आणि अंबाजोगाई या जवळच्या आगारांतून बससेवा पुरवली जाते. मात्र, वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक हिताचा विचार करून नमिता मुंदडा यांनी स्वतंत्र आगाराची मागणी लावून धरली होती. या मागणीची दखल घेत महामंडळाने केज येथे ई-बस आगार उभारून तेथून सुमारे २८ नियते (शेड्युल) चालवण्याचे नियोजन केले आहे. या निर्णयामुळे केज शहरासह ग्रामीण भागातील दळणवळण यंत्रणा अधिक सक्षम होणार असून पर्यावरणपूरक बससेवा प्रवाशांच्या सेवेत रुजू होणार आहे. या निर्णयाबद्दल आ. नमिता मुंदडा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आणि मंत्री पंकजाताई मुंडे यांचे आभार मानले आहेत.

## बीड मध्ये भरदिवसा 'चैन स्नॅचिंग' शिवाजीनगर ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

जालना रोडने घरी जात असलेल्या दुचाकीवर आलेल्या दोघांनी महिलेच्या गळ्यातील गंठण ओरबाडून नेल्याची घटना भरदिवसा घोडके हॉस्पिटल समोर घडली आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात अज्ञात दोन चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र शहरात चैन स्नॅचिंगच्या वाढत्या घटना पाहता शहरात दहशत निर्माण झाली असून, चोरट्यांनी पोलिसांपुढे आव्हान निर्माण केल्याची प्रतिक्रिया व्ये केली जात आहे. शहरात मागील काही दिवसांपासून चैन स्नॅचिंगच्या घटना वाढल्या असून, जवळपास या घटना भरदिवसा घडलेल्या आहेत. यामुळे या चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही असे दिसून येत आहे. रविवारी अशीच घटना भरदिवसा घडली आहे. ज्योती समीर शिंदे (शेलार) या जालना रोडने शांताई हॉटेलच्या बाजूला ▶▶ उर्वरित पान २ वर

# अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला धस कुटुंबीयांचा आधार

अपघातात मृत्युमुखी पडलेल्या ऊसतोड मजुराच्या कुटुंबाला धस कुटुंबीयांचा आधार

### ● जयदत्त धस यांच्याकडून एक लाख रुपयांची एफडी सुपूर्द

**आष्टी । प्रतिनिधी**



कारखाना साईडवर झालेल्या अपघातात दुःखद निधन झालेल्या ऊसतोड मजूर व रिल स्टार म्हणून ओळखले जाणारे गणेश डोंगरे यांच्या कुटुंबीयांना लोकनेते आ.सुरेश धस यांच्या वतीने आर्थिक मदत देण्यात आली. आज डोंगरे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन करण्यात आले. या वेळी कुटुंबाच्या आधारासाठी एक लाख रुपयांची एफडी मदत स्वरूपात सुपूर्द करण्यात आली. ही एफडी जयदत्त भैया धस यांच्या हस्ते देण्यात आली. या प्रसंगी मा. सरपंच हरी पवार यांच्यासह स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ उपस्थित होते. अचानक आधार गमावलेल्या कुटुंबाच्या दुःखात सहभागी होत, या कठीण प्रसंगी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, अशा भावना लोकनेते सुरेश धस यांच्यावतीनेव्यक्तकरण्यातआल्या.



*धारूर तांदळवाडी उंदरी रस्त्याची दयनीय अवस्था किल्ले धारूर प्रतिनिधी सुभाष साखरे धारूर तालुक्यातील तांदळवाडी मार्गी उंद्री ला जाणारा रस्ता रस्त्यात खड्डे का खड्ड्यात रस्ता हेत वाहनचालकाला दिसत नाही कळत नाही तालुक्यातील लोकप्रतिनिधी याकडे लक्ष द्यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे या रस्त्यावर मोठ्या वाहनामुळे रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून खडी रस्त्यावर खड्ड्यातून बाहेर पडली असून रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या वाहनाला मोठी कसरत करावी लागत आहे तरी लोकप्रतिनिधींनी या रस्त्याला निधी देऊन रस्ता बनवण्यात यावा अशी मागणी नागरिकांतून होत आहे. (छाया सुभाष साखरे धारूर.)*

## पोटविकार व लिव्हर आजारांवरील उपचारासाठी प्रसिध्द डॉ. अक्षय कुलकर्णी यांची बीडमध्ये विशेष सेवा

**बीड । प्रतिनिधी**

वाढत्या पोटविकारांच्या पार्श्वभूमीवर बीडमधील एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटलने नागरिकांच्या आरोग्यासाठी एक महत्त्वपूर्ण उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत प्रसिद्ध पोटविकार तज्ज्ञ डॉ. अक्षय कुलकर्णी हे मंगळवार, १३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत रुग्ण तपासणीसाठी हॉस्पिटलमध्ये उपस्थित राहणार आहेत. या विशेष उपक्रमाचा उद्देश पोटविकारांचे लवकर निदान, पोटात किंवा छातीत जळजळ होणे, उलटी आणि संडासमध्ये रक्त पडणे कावीळ असल्यास, लिव्हर सिरोसीस किंवा लिव्हर संबंधी इतर कुठलाही आजार असल्यास ,हिपेटाईटीस बी किंवा हिपेटाईटीस सी चे संक्रमण झाले असल्यास, पित्ताशय किंवा पित्ताशयाच्या नलिकेमध्ये खडे असल्यास, गिळन्यास त्रास होत असल्यास तात्काळ उपचार आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना याबाबत नागरिकांना प्रभावी मार्गदर्शन करणे हा आहे. रुग्णांनी तपासणीसाठी पूर्वनोंदणी करणे आवश्यक असून यात तज्ज्ञांकडून सल्ला, तपासणी आणि योग्य उपचार पद्धतींबाबत मार्गदर्शन मिळणार आहे. या संदर्भात, सय्यद हसीब सर यांनी एक्सिस ऑर्थोपेडिक हॉस्पिटल (माने पेट्रोल पंपाच्या मागे, नर्सरी रोड, बीड) तर्फे सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, आपल्या आरोग्याची काळजी घ्या आणि या संधीचा अवश्य लाभ घ्या. अधिक माहितीसाठी व पूर्वनोंदणीसाठी ९९२३०१०२०२ या क्रमांकावर संपर्क साधावा.

## मौजे कुक्कडगाव चे भुमिपुत्र कृषी उत्पन्न बाजार समिती बीड चे सचिव यशवंत कदम यांचा सेवापुर्ती निमित्ताने सन्मान

**बीड । प्रतिनिधी**



बीड तालुक्यातील मौजे कुक्कडगाव चे भुमिपुत्र कृषी उत्पन्न बाजार समिती बीड चे सचिव यशवंत राणाप्रताप कदम पस्तीस वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर शासन सेवेतुन सेवानिवृत्त झाल्याबद्दल महा एनजीओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य आणि लेक लाडकी अभियान यांच्या वतीने सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह ,शाल, श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले यावेळी दैनिक आत्ताचा एक्स्प्रेस जिल्हा प्रतिनिधी किशोर देवा कुलकर्णी, साप्ताहिक संघर्ष यात्रा चे संपादक आत्माराम वाव्हळ, महा एनजिओ फेडरेशनचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे , प्रकाश गाढे, पत्रकार संजय कुलकर्णी, कुक्कडगाव ग्रामपंचायत सदस्य आत्माराम प्रभाळे, चंद्रकांत नवले, सोनवणे मॅडम, भागवत वैद्य, तुळशिदास पवार,सुदाम आरेकर, महा एनजीओ फेडरेशन चे बीड जिल्हा समन्वयक श्री बाजीराव ढाकणे यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले. बीड तालुक्यातील मौजे कुक्कडगाव येथील भुमिपुत्र यशवंतराव राणाप्रताप कदम शासकीय सेवेतुन प्रदिर्घ काळानंतर सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा सत्कार आणि सन्मान महा एनजिओ फेडरेशन महाराष्ट्र राज्य आणि लेक लाडकी अभियान,महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित केला होता.

# परळी पालिकेत राष्ट्रवादीने एमआयएमला गटातून हाकलून द्यावे : सचिन मुळूक

**अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्या, आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ : शिवसेनेची भूमिका**

**बीड । प्रतिनिधी**



परळी नगरपालिकेच्या निवडणुकीत शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि भाजपच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवून सत्ता स्थापन केली. मात्र सत्तास्थापनेनंतर गटनेता निवडीच्या प्रक्रियेत शिवसेनेला विश्वासात न घेता एमआयएमला गटात सामावून घेण्यात आल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी दिली. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्यांनी तातडीने एमआयएमला गटातून वगळावे, अन्यथा शिवसेनेला गटातून बाहेर पडण्याची परवानगी द्यावी; आम्ही बाहेरून पाठिंबा देऊ, अशी स्पष्ट भूमिका मुळूक यांनी शुक्रवारी (दि. १०) पत्रकार परिषदेत मांडली. यावेळी परळी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, शहर प्रमुख वैजनाथ माने उपस्थित होते. सह्याद्री निवासस्थानी झालेल्या पत्रकार परिषदेत मुळूक म्हणाले की, परळी नगरपालिका निवडणुकीत महायुतीच्या माध्यमातून विजय मिळाला. या निवडणुकीत राष्ट्रवादी ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● जिल्हाधिकाऱ्यांकडे सोमवारी म्हणणे मांडणार

परळी पालिकेतील गटनेता निवडीदरम्यान शिवसेनेला अंधार ठेवून एमआयएमच्या नगरसेवकाला गटात घेण्यात आले. या प्रकरणी वरिष्ठ नेत्यांच्या सूचनेवरुन सोमवारी (दि.१२) जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेणार आहोत. यावेळी शिवसेनेच्या दोन्ही नगरसेवकांच्या सह्यांनी शपथपत्र सादर करून अधिकृत भूमिका मांडण्यात येईल, असे मुळूक यांनी सांगितले.

### ● दानवेंनी स्वत:चे डोके तपासावे

परळी पालिका निवडणुकीत १६ नगरसेवक निवडून आल्याने राष्ट्रवादी सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. या मुळे गटनेता राष्ट्रवादीच्या होणार हे सर्वश्रुत आहे ही साधी बाब विरोधी पक्षनेता राहिलेल्या अंबादास दानवे यांना कळत नसेल तर त्यांनी स्वत:चे डोके तपासून घ्यावे. परळीत त्यांचा पक्ष औषधालाही राहिला नाही. दानवेंनी स्वत:चा पक्ष कसा वाढेल यावर लक्ष केंद्रीत करावे. उबाठाने संभाजीनगरमध्ये रशिद मामू सारख्या दंगलखोर उमेदवारला उमेदवारी दिली. याचा प्रचार करताना अंबादास दानवे यांना लाट वाटत नाही का असेही मुळूक म्हणाले.

## आयुष्यमान भारत – महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना: स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई – २०२५ सालीही मराठवाड्यात अव्वल

### ● योजना प्रभारी डॉ. नितीन चाटे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन

**बीड । प्रतिनिधी**

केंद्र सरकार व महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी आयुष्यमान भारत – महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना (AB-MJPJAY) यांच्या प्रभावी अंमलबजावणीत २०२५ या वर्षातही मराठवाडा विभागातून स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अंबाजोगाई यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. मराठवाड्यातील बहुतांश शासकीय वैद्यकीय महाविद्यालये महानगरपालिका क्षेत्रात कार्यरत आहेत तसेच या महाविद्यालयांमध्ये सुपरस्पेशालिटी युनिट देखील कार्यरत आहेत. दुसरीकडे ग्रामीण भागातील अंबाजोगाई येथील या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात डॉ. नितीन चाटे यांचे सातत्यपूर्ण नियोजन, कार्यक्षम प्रशासन व विविध विभाग प्रमुखांसह रुग्ण समुपदेशन आणि समन्वयाच्या बळावर योजनेची अत्यंत प्रभावी अंमलबजावणी केल्याचे २०२५ च्या आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.

२०२५ मध्ये आयुष्यमान भारत – महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत स्वाराती वैद्यकीय महाविद्यालयात एकूण ६,६३९ रुग्णांवर उपचार करण्यात आले



असून, शासनाकडे या वर्षभरात तब्बल १४ कोटी रुपयांची विमा संरक्षण रक्कम जमा झाली आहे. ही आकडेवारी मराठवाडा विभागातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये सर्वाधिक आहे.

मराठवाडा विभाग : AB-MJPJAY आकडेवारी (२०२५)

स्वामी रामानंद तीर्थ ग्रा. शा. वै. म., अंबाजोगाई– ६,६३९ रुग्ण

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, लातूर– ५,०२४ रुग्ण

डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड – ४,७५१ रुग्ण

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)– ४,७२८ रुग्ण

या उल्लेखनीय यशामागे सर्जरी विभागप्रमुख व योजना प्रभारी डॉ. नितीन चाटे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व महत्त्वाचे ठरले असून, त्यांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीने वाचन चळवळीला नवीन दिशा मिळाली: प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे



**किल्ले-धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये वाचन संकल्प महाराष्ट्राचा पंधरवाडा निमित्ताने माहिती व ज्ञान स्रोत केंद्राच्या वतीने ग्रंथ प्रदर्शन व डिजिटल रिपॉझिटरी प्रदर्शन सोहळ्यास विद्यार्थी, शिक्षक व वाचक वर्गाकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने माहितीच्या साधनांचा वापर कसा करता येतो याची वाचकांना या उपक्रमातून माहिती मिळाली. या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सचिदानंद ढेपे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच वाचक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रदर्शनात विविध विषयांवरील शैक्षणिक, वैचारिक, वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा करिता उपयुक्त ग्रंथ तसेच संशोधनासाठी उपयुक्त संदर्भ ग्रंथ व विद्यार्थ्यांना प्रेरणादायी असलेल्या ग्रंथाचे प्रदर्शन भरविण्यात आले. नव्याने विकसित झालेल्या डिजिटल रिपॉझिटरीच्या माध्यमातून क्यूआर कोडच्या माध्यमातून ई-बुक्स, ई-जर्नल्स, ऑनलाईन डेटाबेस, शैक्षणिक व्हिडिओ, शासनाच्या शैक्षणिक संकेतस्थळांची माहिती वाचकांना प्रत्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर